वर्ष १६ वे
अंक ४ था
२१ मे १९९९
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रू. ५०
किंमत २ रूपये

शेतकरी संघटक

# स्वतंत्र भारताचे नैतिक दर्शन

– शरद जोशी

**बदलाचे वारे**

भारताच्याच नव्हे, सर्व जगाच्या इतिहासात एक प्रचंड बदल घडून येतो आहे. समाजवादाचा जागतिक ऐतिहासिक पराभव झाला आहे. तिसऱ्या जगातील समाजवादाचे ताबूत घेऊन हैदोस घालणारे नामोहरम झाले आणि श्रीमंत राष्ट्रातही अर्थव्यवस्थेतून सरकारी हस्तक्षेप संपवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. अर्थक्षेत्रातली या घटना जितक्या महत्त्वाच्या तितक्याच महत्त्वाच्या घटना राजकीय क्षेत्रातही घडत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर दोन महासत्तांचे युग आले. दोघांच्या टकरीत काही किरकोळ सत्तांचे मोठे फावले होते. समाजवादी महासत्ता कोसळली आणि काही उनाड सत्तांवर शिस्तीचा बडगा उगारला जात आहे. इराक, लिबिया, उत्तर कोरिया, इथियोपिया, हैती, रुआंडा ही ठळक उदाहरणे.

**'शहामृगी' विश्व**

या सगळ्या, उलथापालथ करणाऱ्या घटना घडल्या तरी त्यांचा नेमका अर्थ काय याबद्दल स्पष्ट चित्र नाही. जी ती व्यक्ती किंवा संघटना, जो तो समाज आणि देश नवीन वाऱ्यापुढे थोडेसे झुकून, शक्यतो जुन्या पद्धतीनेच मार्गक्रमणा चालू ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत. आर्थिक अरिष्टे आली त्यामुळे अर्थव्यवस्थेत काही बदल अपरिहार्य झाले, बाकी सगळे काही पहिल्यासारखेच आहे अशा थाटात जग चालले आहे. शहामृगावर शत्रूचा हल्ला झाला म्हणजे तो वाळूत डोके खुपसून स्तब्ध उभा राहतो, असे म्हणतात. आपल्याला जग दिसले नाही म्हणजे जगालाही आपण दिसत नाही अशी त्याची धारणा. नवीन घटनांचा अर्थ काय याकडे आपण दुर्लक्ष केले तर त्यांचा आपल्यावर काही परिणामच होणार नाही अशा 'शहामृगी' विश्वात जग वावरते आहे.

एकेका घटनेचा नेमका अर्थ काय हे तपशीलवार सांगण्याची ही वेळ नाही आणि जागाही नाही. पण, जगातील उलथापालथींचे निष्कर्ष काय हे थोडक्यात सारांशाने मांडले पाहिजे.

१ : अब्राहम लिंकनच्या काळापासून 'सर्व मानवप्राणी समान जन्माला आला आहे' या फ्रेंच राज्यक्रांतीतील तत्त्वाला मान्यता मिळाली. विषमता निर्मूलनाच्या कार्यक्रमात 'माणसे समान आहेत' म्हणजे एकसारखीच आहेत असे मानले गेले आणि माणसाकडे व्यक्ती म्हणून पाहण्याऐवजी समाजाच्या अनेक घटकांपैकी एक हे स्थान त्याला मिळाले. व्यक्ती हरपली, गर्दीत दडपली गेली. समानतेचे तत्त्व फ्रेंच राज्यक्रांतीच्या पहिल्या तत्त्वाचे शत्रू बनले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्त्वत्रयीतील स्वातंत्र्य आणि समता यांच्या क्रमाची उलटापालट झाली. स्वातंत्र्यापेक्षा समता महत्त्वाची ठरली. ही ऐतिहासिक चूक आता सुधारली जाणार आहे. माणसे समान आहेत हे खरे पण त्याचा अर्थ 'ती एका मुशीतली, एकसारखी बाहुली आहेत' असे नव्हे. एका माणसासारखा हुबेहूब दुसरा कोणी असतच नाही; अगदी जुळेभाऊसुद्धा नाहीत. प्रत्येक मनुष्य त्याच्या स्थलकालात अनन्यसाधारण असतो. प्रत्येक व्यक्ती अनन्यसाधारण असते म्हणून मनुष्यप्राणी समान असतो. व्यक्तीची अनन्यसाधारणता हा समानतेचा पाया आहे.

**कशासाठी जगणे**

२ : प्रत्येक अनन्यसाधारण व्यक्ती त्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे आपले जाणिवांचे आणि अनुभवांचे विश्व व्यापक करण्याच्या धडपडीत असते. आयुष्य विविधतेने संपन्न व्हावे, निवड करण्याची संधी क्षणाक्षणाला मिळावी, प्रत्येक निवडीच्या वेळी जास्तीत जास्त विकल्प हात जोडून हजर असावेत आणि ते विकल्पही विविध पठडीतले असावे यासाठी मुनष्यप्राण्याची धडपड चालू असते. माणसाचा शोध स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याच्या आहे; सुखाचा नाही, शांतीचा नाही, समाधानाचा नाही, सत्याचा नाही, शिवाचा नाही, सुंदराचा नाही, संपत्तीचा नाही, सत्तेचा नाही,

**२८ मे १९९४ रोजी मुंबईतील विद्या भवनात देशभरातून आलेल्या कार्यकर्ते व विचारवंतांच्या परिषदेसमोर 'स्वतंत्र भारत' आंदोलनाची भूमिका स्वतंत्र भारत पक्षाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद जोशी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात मांडली. त्या भाषणावर आधारित लेख. स्वतंत्र भारत पक्षाला निवडणूक आयोगाकडून ५ वर्षांनंतर मान्यता मिळाली. त्यानिमित्ताने पुनर्मुद्रण.**

**पूर्वप्रकाशन : २१ जून १९९९**

दुःखीजनांच्या सेवेचा नाही आणि मोक्षाचाही नाही. वेगवेगळ्या व्यक्तींच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचे हे वेगळे वेगळे प्रकार आहेत.

**स्वार्थ हेच उद्दिष्ट**

३ : अनन्यसाधारण व्यक्तीची चालायची वाट रुळलेली नाही, मार्गदर्शक कोणी नाही, त्याच्या प्रेरणा हाच त्याच्या हातातील दिवा. प्रमुख प्रेरणा अहंकाराची. एका बाजूला मी आणि दुसऱ्या बाजूला सारे जग ही जाणीव मुळी त्याच्या अनन्यसाधारणत्वाचा गाभा आहे. त्याचे उद्दिष्ट – स्वार्थ त्याला साधायचा आहे. कोणाला स्वार्थ पैशात दिसेल, कोणाला विद्येत, कोणाला शुद्ध आळशीपणे पडून राहण्यात. या व्यापक अर्थाने प्रत्येक व्यक्ती आपापला स्वार्थ साधण्याकरिता धडपडते. लक्षावधी कोट्यवधी स्वार्थी व्यक्तींच्या धडपडीतून नकळत परमार्थ संपादिला जातो. शरीरातील एकेक पेशी तिच्यातिच्या स्वभावाप्रमाणे धडपडत असते. अशा धडपडीतूनच संबंध शरीराची एकात्मता बनते. स्वार्थ सत्य आहे, परमार्थ विपाक आहे.

**व्यक्तीचा मंचप्रवेश**

४ : एक व्यक्ती आणि विश्व यांचे हे एकात्मकतेचे निसर्गसिद्ध नाते आहे. हे अध्यात्मात जितके खरे तितकेच अर्थव्यवस्थेत किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात. माणसाच्या अंतिम कल्याणाचा मार्ग दाखवणारा साधु, संत, अवतार, प्रेषित, बाबा, महाराज असत नाहीत. तसेच, कोथींबीर किती पिकवावी आणि आगगाडीची इंजिने किती बनवावीत याचा हिशेब मांडणारा कोणी 'नियोजन महात्मा'ही असत नाही. आर्थर क्लोसर यांचे शब्द वापरायचे तर या जगात 'कमीसारां'नाही स्थान नाही आणि योग्यांनाही नाही. योगी, कमीसार, बाकी सारे मध्यस्थ, अडते हे व्यक्ती आणि विश्व यांची एकात्मता बिघडवण्याचेच काम करतात आणि आपल्या सिद्धांतांच्या अतिरेकी हट्टापायी रक्ताचे पाट वहावतात. अनन्यसाधारण व्यक्ती मंचावर येत आहे, 'मध्यस्थ महात्म्यां'ची उचलबांगडी होत आहे.

**समाजव्यवस्थेचे फोल प्रयत्न**

५ : व्यक्ती कितीही अनन्यसाधारण असली तरी तिला समाजात राहावे लागते, साधने संपादन करावी लागतात, वस्तूंची आणि सेवांची देवघेव करावी लागते, देखरेखीसाठी विविध प्रकारची सत्तास्थाने आवश्यक असतात; सोयीस्कर वाटतात. पण, सत्ता आली की भ्रष्टाचार आला. कारण, सत्ता निगर्सविपरीत आहे. सत्तेशिवाय चालत नाही आणि सत्तेने सगळे काही बिघडते हा मनुष्यजातीला पुरातन कालापासून पडलेला पेच आहे. सत्ता-भ्रष्टाचार, सत्तास्पर्धा हे सगळे टाळण्याकरिता इतिहासात अनेक प्रयोग झाले. माणसाची कामे जन्माच्या आधारानेच ठरावीत आणि त्यात प्रत्येकाने संतोष मानावा अशी व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न झाला. समाजाला स्वतःच्या सामर्थ्याप्रमाणे देणारा आणि केवळ आपल्या गरजेपुरतेच घेणारा उदात्त समाजवादी माणूस तयार करण्याचेही प्रयत्न झाले. हातातील सत्ता, संपत्ती विश्वस्ताच्या निरिच्छेने हाताळली जावी अशा गांधीवादी नैतिक माणसाची कल्पना पुढे मांडण्यात आली. पण, हे सगळे प्रयत्न फसले. माणसाची गुणवत्ता सुधारण्याचे महात्म्यांनी सांगितलेले मार्ग निसर्गाला रुचत नाहीत असे दिसते. श्रेष्ठत्व आणि गुणवत्ता म्हणजे काही एक ठराविक प्रकारची भूमिका हे निसर्गाला मान्य नाही. मनुष्य अनुभवसंपन्न आणि परिपूर्ण असावा. ठोकळेबाज पुरुषार्थाच्या कल्पना निसर्गाला मान्य नाहीत. सत्तेची दुष्टता टाळण्याचे गुणात्मक उपाय सारे फसले. सत्तेची दुष्टता संपवण्याचा एकच मार्ग म्हणजे सत्ताकेंद्राची विविधता आणि त्यांच्यातील स्पर्धा. सत्ताकेंद्र म्हणजे काही फक्त राजधानीतील केंद्र नाही. प्रत्येक माणूस आपापल्या जागी, आपापल्या काळी काही प्रमाणाततरी सत्ता गाजवतच असतो. कोणाचीही सत्ता निरंकुश नको, त्याला स्पर्धा पाहिजे, तरच दुष्टता आटोक्यात राहण्याची काही आशा.

**स्पर्धा**

६ : स्पर्धा ही जगातील चैतन्याचे रहस्य आहे. ती काही फक्त बलदंडांची टक्कर नाही. स्पर्धा हा प्रशिक्षणाचा सगळ्यात प्रभावी आखाडा आहे. स्पर्धेत उतरल्याने स्पर्धा करण्याची शक्ती वाढते; जसे, पाण्यात उतरल्याने पोहता येते, मूल पडतापडता चालायला शिकते.

**जोपासना दुर्बलांसाठी**

७ : या उलट संरक्षणाने देणाऱ्याचे भले होत नाही, ना घेणाऱ्याचे. व्यक्तींच्या विविधतेत काही दुर्बल घटक असणारच. लहान मुले, मतिमंद, दुर्बल, अपंग हे देखील समाजाचे घटकच आहेत. स्पर्धेशिवाय दुर्बलांच्या जोपासनेचे सूत्रही महत्त्वाचे आहे. पण जोपासणी अपंगपणा वाढवणारी, विकासाची इच्छा खुंटवणारी नको. हातपाय नसलेल्यांना जागतिक खेळांच्या स्पर्धेत भाग घेता येणार नाही, पण त्यांची त्यांची स्वतंत्र खेळांची स्पर्धा असू शकते. लंगडे आणि सुदृढ यांचे सगळ्यांचे मिळून एकत्रच खेळ झाले पाहिजे असा कोणी आग्रह धरला तर ते कोणाच्याच भल्याचे नाही; ना सुदृढांच्या, ना अपंगांच्या.

**व्यक्तिविकास हाच समाजविकास**

८ : व्यक्तीच्या विकासाच्या धडपडीतून समाजाचा, राष्ट्राचा विकास होतो, विकास कोठे थटला असेल तर समजावे, व्यक्तीच्या विकासाच्या स्वातंत्र्यावर कोणीतरी कोठेतरी बंधन घातले आहे. विकास निसर्गसिद्ध आहे, गरीबी निसर्गविपरीत आहे. व्यक्ती आणि विश्वाच्या एकात्मतेला तडा देऊ पाहणाऱ्यांनी गरीबी तयार केली आहे. गरीबांच्या छातीवरून उठणे यासारखा परिणामकारक 'गरीबी हटाव' कार्यक्रम नाही.

**शासन विकासातील आडकाठी**

९ : शासन जितके अधिक तितका विकास कमी. फार फार तर कायदा, सुव्यवस्था इत्यादी गोष्टी शासनाने पहाव्या. अर्थकारण, शिक्षण, अध्यात्म, न्याय, प्रसार माध्यमे या क्षेत्रांतील सत्तास्थाने स्वतंत्र आणि सार्वभौम असली पाहिजेत.

सगळ्या जगात जे खुलेपणाचे वारे वाहत आहे त्याचा अर्थ हा असा आहे. स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही, असे लोकमान्य म्हणाले. वर्तमान घटनांचा निष्कर्ष असा की, खरे स्वराज्य आपोआपच सुराज्य असते. 'सुराज्य' नाही तेथे 'स्वराज्य' नाही असे निःशंकपणे समजावे. 'इंडिया-भारत' द्वैत तयार झाले की गरीबीने ठाण मांडलेच म्हणून समजा.

**'समाज'वाद्यांची टीका**

स्वातंत्र्याच्या पाईकांची ही अशी भूमिका आहे. स्वातंत्र्य, स्पर्धा, खुली व्यवस्था असे शब्द वापरले की व्यक्तीपेक्षा समाज महत्त्वाचा मानणाऱ्या विचारांच्या वेगवेगळ्या रंगछटा असलेल्या 'समाज'वाद्यांकडून व्यक्तिवाद्यांवर टीकेचा भडीमार सुरू होतो. तुमचा समानतेवर विश्वास नाही; तुम्ही विषमतावादी आहात; तुम्ही डार्वीनवादी आहात; समर्थांनी तेवढे जगावे, दुर्बलांनी नष्ट व्हावे अशी तुमची धारणा आहे; तुम्ही अराजकवादी आहात; समाजात सत्तास्थाने म्हणून तुम्हाला नकोत; तुम्ही राष्ट्रवादी नाहीत; तुम्हाला स्वदेशाचा अभिमान नाही असा आरोपांचा भडीमार होतो. या टीकांतील निरर्थकता दाखवणे महत्त्वाचे आहे.

**स्वतंत्रतावादी भूमिका**

स्वतंत्रतावादी हे व्यक्तीला केंद्रस्थानी मानतात. व्यक्तीची अनन्यसाधारणता पवित्र मानतात. पण याचा अर्थ, ते मनुष्यप्राण्यांत श्रेष्ठ-कनिष्ठता मानतात असे नाही. कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही. जो तो अनन्यसाधारण आहे आणि ज्याच्या त्याच्या फूटपट्टीने श्रेष्ठ आहे. मनुष्यप्राणी समान आहे. त्याचे समानत्व त्याच्या अनन्यसाधारणत्वात आहे. जन्मजात आळशी माणूससुद्धा कनिष्ठ नाही. 'स्वस्थ आरामात पडून राहावे; त्यामुळे, पोटाला थोडे कमी मिळाले तरी चालेल, संसार नसला तरी चालेल.' इतक्या खंबीरपणे आळशी असलेला मनुष्यदेखील उद्योगी पुरुषसिंहापेक्षा कनिष्ठ नाही. त्याच्या वैशिष्ट्याचे पारितोषिक त्याच्या क्षेत्रातील चलनातच मिळणार, उद्योजकांच्या चलनात नाही, एवढाच काय तो फरक.

स्वतंत्रतावादी अराजक मानत नाहीत. सत्तास्थाने लागतात, उपयोगी असतात हे, दुर्दैवी का होईना, वास्तव आहे. सत्तेतील भ्रष्टता टाळण्याकरिता सत्तास्थाने बहुविध असावीत, अनेक असावीत, सार्वभौम असावीत ही मांडणी अराजकाची नाही, बहुराजकाची आहे.

डार्विनवादाचा आरोप असाच खोटा आहे. जगून राहण्याची धडपड विनाशकारीच असते हे खरे नाही. संघर्षात माणसाचे यच्चयावत ऊर्जास्रोत संपूर्णपणे पणाला लागतात. त्या स्पर्धासंघर्षात जे टिकणार नाहीत त्यांना 'जोपासना वर्गा'त जाता येईल. खुल्या स्पर्धेत कच्चे लिंबू म्हणून भाग घेण्याचा आग्रह त्यांना सोडावा लागेल किंवा वरच्या वर्गात बरोबरीला येण्याची क्षमता सिद्ध करावी लागेल.

'खुली व्यवस्था'वादी राष्ट्रवादी नाहीत, आंतरराष्ट्रवादी आहेत हा आरोपही चुकीचा आहे. व्यक्तीच्या विकासाच्या धडपडीत विविध प्रकारच्या संघटना उदयाला येतात, नष्टही होतात. कुटुंब, गाव, जाती, धर्म, राष्ट्र अशा चढत्या श्रेणीच्या संघटना उत्क्रांतीच्या प्रवाहात माणसाने तयार केल्या. या सगळ्या संघटनांचे आणि सामुदायिक जाणिवांचे अलग अलगपणे आणि एकत्र मोठे महत्त्व आहे. आजपर्यंत माणसाची वाहतुकीची, संचाराची, देवघेवीची साधने मर्यादित राहिली. त्यामुळे त्याचे सारे संपर्क भूगोलाने मर्यादित केले. तंत्रज्ञानाची प्रगती वाढेल, तासाभरात पृथ्वीप्रदक्षिणा करता येईल किंवा आपल्या जागी बसून जगातील दुसऱ्या कोणत्याही माणसाशी बोलता येईल, तिला पाहता येईल, कदाचित् स्पर्शही करता येईल अशी प्रगती झाली तर भौगोलिक राष्ट्र या संकल्पनेचे फारसे महत्त्व राहणार नाही, हे उघड आहे.

**कांगावखोर 'स्वदेशी'वाले**

पण, आज तशी स्थिती नाही. प्रादेशिक सरहद्दीत शेजारी म्हणून राहणाऱ्या लोकांमध्ये विविध प्रकारांनी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक जवळकीची भावना आहे. आपापल्या समाजात वावरताना घरी असल्यासारखे वाटते ही जाणीवही मोठी मौल्यवान गोष्ट आहे. त्यासाठी, शेकडो भगतसिंग फाशी चढायला तयार होतात. खरे तर, राष्ट्रवादाचा आणि स्वदेशीचा उदे उदे, उद्घोष करणाऱ्या लोकांनी राष्ट्रकल्पनेचा बाजार मांडला आहे. 'स्वदेशी'च्या नावाखाली आपला खत्रूड माल आपल्याच देशबांधवांच्या गळी महागड्या किंमतीने बांधता आला म्हणजे देशभक्ती आणि, कातडीचा रंग थोडा वेगळा असणाऱ्या लोकांनी सर्वसामान्य जनतेला उत्कृष्ट माल कमी भावात आणून दिला तर मात्र देश बुडाला अशी हाकाटी करणाऱ्यांचा 'स्वदेशी' हा कांगावा आहे.

'स्वदेशी'वाल्यांनी देशाला काय दिले? महान परंपरांचा, उज्ज्वल इतिहासाचा हा देश. आजही इथली माणसे परदेशात गेली तर सर्वांना अचंबा वाटावा अशी कर्तबगारी दाखवतात. समाजवाद्यांनी, सरकारवाद्यांनी, 'स्वदेशी'वाद्यांनी स्वार्थासाठी देशाभोवती कुंपणे घातली आणि एक महान राष्ट्र जगातील कंगाल आणि दळभद्री राष्ट्र बनवून टाकले. देशातील 'खऱ्या राष्ट्रवाद्यां'ची इच्छा ही कुंपणे तुटावीत, इथल्या कर्तबगार जनतेच्या हातापायांतील सरकारशाहीच्या दंडबेड्या तुटाव्यात आणि जगातील राष्ट्रांच्या बैठकीत भारताला त्याचे इतिहाससिद्ध, निसर्गसिद्ध स्थान पुन्हा एकदा लाभावे अशी आहे. स्वतंत्रतावाद्यांची भूमिका राष्ट्र जोपासण्याची आहे, राष्ट्र खाण्याची नाही.

**'स्वतंत्र भारत'च्या पाईकांचे स्वप्न**

जगात भारताचे स्थान पुन्हा एकदा उंचावण्याचा कार्यक्रम फारसा कठीण नाही. एकविसावे शतक उगवण्याआधी त्याची अंमलबजावणी सहज शक्य आहे. या देशाचे लोक प्रेरणा घेऊन उठले तर तीन वर्षात हे होऊ शकेल. कार्यक्रम सोपा आहे. सरकारी हस्तक्षेप कमी करा, सरकारशाहीचे ओझे उतरवा, गेल्या पन्नास वर्षांत सरकारशाहीने देशाचे जे नुकसान केले ते नुकसान संपवा आणि राष्ट्राच्या जिव्हारी लागलेल्या जखमा भरून काढा.

बेकारी, गरीबी, भ्रष्टाचार, गुन्हेगारी यांनी जर्जर झालेल्या या देशाचा आज जगात मान नाही. इथले भाईबंददेखील देशातून निघून वेगळी चूल मागत आहेत. भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला तर आज त्याची हेटाळणी करणारे, दुष्टावा करणारे, त्यापासून फुटून जाऊ पाहणारे उद्या त्याच्याशी संपर्क असावा, जमले तर त्याने आपणास सामावून घ्यावे असे प्रतिपादू लागतील आणि त्यासाठी जुन्या इतिहासातील, पुराणातील नकाशांचे दाखले देऊन अखंड भारताचा आग्रह धरू लागतील. हे स्वांतत्र्याच्या पाईकांचे स्वप्न आहे.

यासाठी 'स्वतंत्र भारत' चळवळीचे तोरण बांधण्याला घेतले आहे. ●

# टर्मिनेटर थ्री?

बी-बियाणे, नव्या जाती तयार करण्याच्या पद्धतीत अमूलाग्र बदल होत आहेत. गेल्या दोन दशकात जैविक तंत्रज्ञान आणि युक्त्याप्रयुक्त्यांची झपाट्याने वाढ झाली. त्यातून रोगसंरक्षण शास्त्र (इम्युनॉलॉजी), ऊती संवर्धन, जैविक अभियांत्रिकी अशा शाखोपशाखांचा जोमाने प्रसार झाला. भारतातल्या बह्वंशी संशोधनसंस्था, कृषीविद्यापीठे, सरकारपुरस्कृत प्रकल्पही या बाबतीत बरेच मागे पडलेले आढळतात. त्यांची अगोदरची बव्हंश कर्तबगारीही आयात तंत्राच्या नकलेवर आणि अनुनयांवर आधारली होती. पण सरावाने जुन्या 'संख्याशास्त्रीय जननपद्धती'वर पारंगत असणारे संशोधन त्यातून तयार झाले, पण नव्या जैविक व जनुक तंत्रज्ञानाबाबतीत ते मागेच आहेत. अन्य देशातल्या संशोधकांवर व्यावसायिक व्यवहार्यता, स्पर्धा, गिऱ्हाईकांची गरज हेरून तंत्र विकासण्याची धडपड अशा घटकांचा लक्षणीय प्रभाव असतो. त्याचा अभाव असल्याने नोकरशाही संशोधन मागे पडणे स्वाभाविकच आहे.

नव्या जैवतंत्रज्ञानाने होणाऱ्या बदलाची झलक एका कापसाच्या वाणाने दाखवली आहे. त्याचा बोलबाला इतरत्र जवळपास दशकभर होतो आहे, पण जेव्हा ते भारतात प्रत्यक्षात अवतरले, तेव्हा त्याचे स्वागत आपल्या स्वभावानुसार विरोधी हलकल्लोळाने झाले. हे तंत्र काय आहे ते अगोदर पाहू. बॅसीलस थुरिंजेनिंसस (संक्षेपाने बी.टी.) हा मातीत आढळणारा जीवाणू आहे. आपल्या स्वतःची वाढ करताना हा एक प्रकारची विषारी प्रथिने बनवतो.

त्या प्रथिनांचेही हजारो प्रकार आजवर मिळाले आहेत. पतंगवर्गीय कीटकात अल्कली द्रावण असते. ही प्रथिने अल्कली विद्राव्य असतात. परिणामी हे जीवाणू 'कीटकनाशक' ठरतात. इतर प्राणी, वनस्पती, माणसे यांसाठी हे प्रथिन विषारी नसते. 'मोन्सान्टो' या बहुराष्ट्रीय कंपनीने या जीवाणू प्रथिनाचा अभिनव वापर करून पाहिला. एरव्ही 'बीटी'चा वापर करून अनेक जैविक कीटकनाशके तयार केली जातात व ती फवारून वापरली जातात. 'मोन्सान्टो'ने हा प्रथिन बनविणारा 'जनुक-तुकडा' वेगळा काढला. त्याला 'क्रायलॅक' असे नाव आहे. तो तुकडा कापसाच्या वाणाच्या जनुकात घातला. असे एका सजीवाच्या जनुकाचे (जीनचे) तुकडे दुसऱ्या जीवात घालणे म्हणजे 'ट्रायजेनिक्स'. हा विषारी जनुकतुकडा कापसाच्या पेशीसमवेत आपोआप वाढतो. कारण आता तो त्याचा भागच झालेला आहे. जेव्हा कापसावरली बोंडअळी पात किंवा अन्य कुठलीही पेशी कुरतडेल तेव्हा ती 'बीटी' खाईल व तिची पचनसंस्था या विषाने लुळी पडेल. परिणामी ती वनस्पतीरूपातले अन्न खाऊ शकणार नाही व मरेल. 'पे-मास्टर' नावाच्या अमेरिकन कापसाच्या वाणाबाबत हा खटाटोप यशस्वी झाला. कापसाबाबतचे यश हे लक्षणीय आहे. कारण रासायनिक व जैविक कीटकनाशकांच्या एकूण खपात कापसाचा वाटा पंचेचाळीस ते पन्नास टक्क्यांइतका भरघोस आहे. या यशामुळे कीटकनाशकांचा वापर घटणार. हे नवे – कवचकुंडल असलेले कीटक संहारक वाण शेतकऱ्यांना आकर्षक वाटणार. अर्थात इतर घटक (उदा. उत्पादन, पाण्याचा ताण, फुलावर येण्याचा काळ वगैरे वगैरे) अन्य जातींइतके अनुकूल असतील तरच. कीटकनाशकांमुळे होणारा खर्च वाचतो म्हणून त्या प्रमाणात या वाणासाठी अधिक किंमत मोजायलाही शेतकरी तयार होईल. जर ही किंमतवाढ एकूण बचतीच्या व उत्पादकतेच्या अपेक्षित प्रमाणात नसेल, तर हे वाण दीर्घकाळात लोकप्रिय राहणार नाही.

अशा प्रकारचे नवे वाण, जाती तयार करायला भारतीय संशोधक संस्था, विद्यापीठे समर्थ आहेत? त्याची छाननी, तपासणी, फेरजुळणी करण्याची त्यांची कुवत आहे? याचे उत्तर बह्वंशी 'नाही' असे आहे. पण ही 'कुवत' 'सामर्थ्य' नाही हे उघड झाले वेगळ्याच कारणाने.

अमेरिकेत 'डेल्टा पाईनलँड' ही एक बियाणेउत्पादक कंपनी होती. त्यांनी ज्यामुळे वनस्पतींचे 'पुनर्उत्पादनाचे' चक्र चालू राहते तो 'जनुक तुकडा' बदलला. त्यामुळे वाणाचे 'खच्चीकरण' झाले. सरकारी प्रचाराला स्मरून आपण त्याला 'नसबंदी-वाण' म्हणू. अर्थातच हे जैविक अभियांत्रिकीने बनवलेले वाण एकदाच वापरता येते. त्या तंत्रावर त्यांनी मार्च ९८ मध्ये अमेरिकेत पेटंट ही घेतले. पण त्यानंतर सहा महिन्यांनी 'डेल्टा पाईनलँड' ही कंपनी मोन्सान्टोने विकत घेतली. दरम्यान मोन्सान्टो भारतात 'बोलगार्ड' या नावाने 'बीटी' जीवाणू आत्मसात केलेली कापसाची जात विकसित करण्याच्या चाचण्या घेत होती.

'बीटी इंडोटॉक्सिन' आत्मसात केलेले वाण व 'नसबंदी वाण' याचा अर्थाअर्थी लगोलग संबंध नाही. पण ज्या अर्थी डेल्टा पाईनलँड मोन्सान्टोने घेतली, त्याअर्थी त्यांच्या सगळ्या वाणात हा 'नसबंदी' गुण असणार असा धोशा काही जणांनी सुरू केला. 'शिंके तुटले असते आणि जावयाच्या डोक्यावर पडते तर माझी लेक विधवा झाली असती' असे हे अकांडतांडव होते. मोन्सान्टोवर हा आरोप झाल्यावर त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यांचे खरेखोटे कसे करायचे? स्वाभाविकच सगळ्यांच्या नजरा 'जागतिक दर्जाचा' भारतीय शास्त्रज्ञांकडे वळल्या, पण त्यातल्या बहुतेकांनी परदेशात पण यावर विचार चालू आहे, मग आपण कशाला परवानगी द्या? असा बचावी पवित्रा घेतला. पण बोलगार्डमध्ये 'टर्मिनेटर जीन' आहे की नाही याचे उत्तर त्यांच्याकडे नव्हते. परिणामी त्यांनी अखेरीस कबूल केले की यात टर्मिनेटर जीन आहे की नाही हे आम्ही सांगू शकत नाही. कारण ते तपासण्याचे तंत्रज्ञान व क्षमता आपल्याकडे नाही. तात्पर्य आम्ही भूतपिशाच्च, राक्षस कोण हे सांगू शकतो, पण भूतपिशाच्च ओळखण्याची खूणगाठ आमच्यकडे नाही. अशा या मोठ्या तार्किक पायावर असणाऱ्या विरोधकांकडे भयपट तयार करण्याचे कसब मात्र स्पिलबर्गला लाजविणारे आहे. ज्याची नसबंदी झाल्याने जे स्वतः वाढत नाही त्याचे परागकण अन्य वनस्पतीवर पडणार आणि आपले 'नसबंदी' रूप मात्र अन्य वनस्पतीत घालणार, असे पंडुराजाच्या शापाने ग्रासलेले वाण सगळ्या वनस्पतींवर आपली नपुंसक पिढी लादणार. म्हणून काय करा.....मोन्सान्टोला हाकला. नवे बियाणे

करण्यापूर्वी आम्हाला विचारा. आमच्या जैवविविधतेच्या प्रमाणपत्राखेरीज बळीराजाने वाण घेऊ नये, पेरू नये इ.

'नसबंदी वाणां'मुळे शेतकऱ्याला पुन्हा पेऱ्यासाठी वापरता येणार नाही हा बागूलबोवा अनाठायी आहे. आजदेखील अनेक संकरीत वाणांबाबत तीच स्थिती आहे. या तंत्राचे मोन्सान्टोला आकर्षण वाटते ते शेतकऱ्यांच्या खरेदीच्या गरजेचे नव्हे. अन्य बियाणे उत्पादकांना सहजी 'पायाभूत बियाणे' मिळवणे यामुळे अधिक दुस्तर होईल. त्यामुळे नक्कल करणे, सुधारणा घडवून नवे वाण बनविणे अवघड होईल ही त्यातली खरी भूल आहे. तीही पुरेसे तांत्रिक यश आले तर! बियाणे व्यवसाय पुरेसा स्पर्धाशील राहिला (व ठेवला) तर या युक्तीचा वापरही फार काळ प्रभावी राहणार नाही.

नवे तंत्रज्ञान आले की त्यावर 'नैतिकते'चा बडगा चालविणारे वाद नेहमीच उद्‌भवतात. आपल्या काही गांधीवाद्यांना देशी गाय आणि विदेशी वळू यांचा संकर अनैतिक वाटत असे. एखाद्या संभाव्य तंत्राचा, त्याच्या संभाव्य लाभाचा आणि खर्चाचा आधी अटकळ बांधून हिशोब करायचा. तथाकथित अंदाजित लाभ तथाकथित खर्च व धोक्यांपेक्षा जास्त असेल तरच ते तंत्र व विज्ञान विकसित करू द्यायचे, ही एक लोकप्रिय पण वाह्यात कल्पना आहे. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रातला हा बेगडी 'उपयुक्ततावाद' आहे. एकतर विज्ञानाची वाटचाल या कल्पनांनुसार होत नाही. झालीच तर 'लायसेंको' वादासारखे दुष्परिणाम होण्याचा धोका असतो.

तात्पर्य तंत्रज्ञानात धोके असतील तर त्यावर हाकबोंब उठविणारे जागरुकही असतील; त्यांची दखल यथोचित व्यवहार्य कसोटीवर शेतकरी घेतील; पण ज्याचा वेध घेण्याचीही ज्यांची कुवत नाही, अशा अर्धप्रशिक्षित शास्त्रज्ञांनी आणि पर्यावरण-वाद्यांनी शेतकऱ्यांच्या वतीने त्या तंत्रज्ञानावर बंदी घालण्याची भाषा करू नये.

**प्रा. प्रदीप आपटे**

अर्थतज्ज्ञ

*(लोकसत्ता : ११ मे १९९९ वरून)*

# व्यापारशेतीचा आगळा प्रयोग

लातूर दि. ६ : यापुढे दरवर्षी लातुरात भव्य स्वरूपात ॲग्रोसेल होईलच, शिवाय महाराष्ट्रात किमान दहा ठिकाणी ॲग्रोसेल घेण्यात येईल, अशी घोषणा बळीराज्यचे संपादक व ॲग्रोसेलचे प्रणेते श्री. अमर हबीब यांनी समारोप प्रसंगी बोलताना केली.

दि. १ ते ५ मे या काळात लातूरच्या टाऊन हॉल मैदानावर आयोजित ॲग्रोसेल ९९ चा समारोप काल अमर हबीब यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी माजी आमदार शिवराज तोंडचिरकर हे होते.

कुठल्याही क्षेत्रात मक्तेदारी असली की तिथे सेवा मिळत नाही; याचा अनुभव सध्या वीजमंडळाबाबत येत आहे. कृषी उत्पादनावर प्रक्रिया करताना वीजमंडळाचा सर्वाधिक फटका बसतो आहे. वीजनिर्मितीच्या क्षेत्रात अधिक खुलेपणा व स्पर्धा आणण्याची गरज व्यक्त करून अमर हबीब म्हणाले, भारतातील शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय हा चॉइस म्हणून निवडलेला नाही. अपघाताने, नाईलाज म्हणून त्यांनी हा व्यवसाय निवडला आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांत उद्योजक शोधणे मोठे कठीण आहे. ॲग्रोसेल ९९ ने हे काम काही प्रमाणात केले आहे. शेतकऱ्यांच्या लुटीचा सात हजार वर्षांचा इतिहास अशा एखाद्या दुसऱ्या कार्यक्रमाने बदलणार नाही. मात्र ॲग्रोसेलने बंद दरवाजा किलकिला करून प्रकाश दाखवण्याचे काम केले आहे.

ॲग्रोसेल ९९ हा शेतकरी संघटनेचा अधिकृत कार्यक्रम नाही. मात्र हा कार्यक्रम संघटनेच्या विचाराचा आत्मा आहे. यापूर्वी शेतकरी संघटनेने अनेक चळवळी केल्या. ॲग्रोसेल ही सरकारची नांगी मोडण्याचा नवा सत्याग्रही मार्ग आहे. ॲग्रोसेल जिल्हा पातळीवर व्हावेत शिवाय ते गावा-गावांनी आयोजित करावेत अशी अपेक्षा आहे. २००१ साली मुंबईत मोठे ॲग्रोसेल होईल व त्यात निर्यातदार व्यापारी सहभागी होतील, अशी घोषणा करून अमर हबीब यांनी परदेशात भारताची ॲग्रोसेल भरवण्याची कल्पना बोलून दाखवली. शेतीमाल हेच विदेशी चलन मिळविण्याचे माध्यम आहे. म्हणून शेतीव्यापारावरील निर्बंध हटले पाहिजेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

ॲग्रोसेल्सला प्रचंड असा प्रतिसाद देऊन लातूरकरांनी शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवल्याबद्दल आभार व्यक्त करून अमर हबीब यांनी, ॲग्रोसेलमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्टॉलधारकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार शिवराज तोंडचिरकर म्हणाले, ॲग्रोसेलचा हा क्रांतीकारी कार्यक्रम आयोजित करणारे संयोजक अभिनंदनास पात्र आहेत. आज शेतीमालाला भाव मागण्यासाठी आंदोलन करण्याची गरज नाही. फक्त शेतकऱ्यांच्या पायातील बेड्या बाजूला करण्याची गरज आहे. ॲग्रोसेलने हे काम करून शेतकऱ्यांना नवा मार्ग दाखवला आहे.

शिवार बाजारचे कार्यकारी संचालक अनंत देशपांडे यांनी पुढील वर्षीचे ॲग्रोसेल शिवार बाजार भरवणार असल्याचे घोषित करून, उत्पादक व ग्राहक यांच्यातील दुवा म्हणून शिवार बाजार काम करेल अशी ग्वाही दिली.

उत्पादकांचे प्रतिनिधी म्हणून बोलताना व्यंकट गुऱ्हाळे यांनी ॲग्रोसेलचा हा अनुभव शेतीमालाचा उत्पादक म्हणून अतिशय उपयुक्त ठरल्याचे सांगून यापुढील काळात होणाऱ्या ॲग्रोसेलमध्ये सहभागी होण्याचे आश्वासन दिले. ग्राहकांचे प्रतिनिधी म्हणून बोलताना प्रा. रवींद्र गोवंडे यांनी ॲग्रोसेलच्या या उपक्रमाचे स्वागत करून यापुढील काळात अधिक व्यापक प्रमाणावर ॲग्रोसेल भरवावेत अशी सूचना केली. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते ब. ल. तामसकर यांनी या कार्यक्रमामुळे 'शेतकऱ्यांचे कत्तलखाने बंद पडतील' असा विश्वास व्यक्त केला.

प्रारंभी आ. तोंडचिरकर यांनी म. फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. 'मानवलोक'च्या कार्यकर्त्यांनी स्वागत गीत म्हटले. स्वागताध्यक्ष महारुद्र मंगनाळे यांनी पाहुणे व ॲग्रोसेलच्या संयोजकांचे पुष्पहाराने स्वागत केले. मंगनाळे यांच्या हस्ते बळीराज्यच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. आभार प्रदर्शन बळीराज्याचे प्रकाशक अच्युत गंगणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रसिद्ध साहित्यिक डॉ. शेषेराव मोहिते यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला आ. तोंडचिरकर यांनी सर्व स्टॉलधारकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर अमर हबीब यांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

प्रेषक : **ब. ल. तामस्कर**

# स्थिरतेचा भस्मासुर

## सतीश देशमुख

बारावी लोकसभा ही तेरा महिन्यातच आटोपली. कुणालाही बहुमत नसल्यामुळे असे काही घडेल असे मतदारांना आणि राजकीय जाणकारांना सुरवातीपासूनच वाटत होते. सर्वसामान्य मतदार हा स्थिरतेच्या बाजूने असल्यामुळे आणि 'अस्थिर सरकार त्यांना जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याची इच्छा असूनसुद्धा घेऊ शकत नाही' असा पद्धतशीर प्रचार सत्तारूढ आघाडीने केल्यामुळे होऊ घातलेल्या निवडणुकीत काँग्रेस, भाजपासारखे राष्ट्रीय पक्ष स्थिरतेचा मुद्दा पुढे करूनच निवडणुका लढवणार आहेत; तर त्यांना पाठिंबा देणाऱ्या पिलावळी आम्ही ज्या आघाडीत आहोत तीच आघाडी कशी स्थिर राहील हे मतदारांना पटविण्याचा प्रयत्न करतील. सर्व प्रश्न बाजूला सारून स्थिरतेसारख्या विचित्र मुद्द्यावर ही निवडणूक होणार. मतदार, प्रचारमाध्यमे आणि देशातले तमाम बुद्धिवादी स्थिरतेच्या बाजूने आहेत. दूरचित्रवाणीवरील हास्यअभिनेता जसपाल भट्टी यांनी पंधरावीसजणांची रॅली काढून जनतेपुढे स्थिरतेचे आवाहन केले आणि दूरदर्शननेसुद्धा जसपाल भट्टी फार मोठा प्रश्न घेऊनच लढताहेत असे चित्र उभे केले.

८४ सालच्या आधीच्या निवडणुकांचा मागोवा घेतला तर काँग्रेस पक्ष गांधी-नेहरूंच्या नावांवर निवडणुका लढवत आला तर काँग्रेसलाच नेहमी संधी का? आम्हालाही संधी देऊन तर बघा, नंतर देशाची प्रगती पहा. सर्वत्र आबादीआबाद करू, सब घोडे बारा टक्के, टक्केसे भाजी और टक्केसे खाजा, असे विरोधक, 'दिवसा चांदणे दाखवायचे.'

७७ सालच्या जनता पक्षाच्या सरकारचा अनुभव शेतकऱ्यांसाठी तरी निदान अत्यंत वाईट वाईटच. प्रख्यात गांधीवादी मोराजीभाईंनी गांधीजींचे नाव घेत घेतच शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याचा डावच मांडला. ऊसउत्पादक शेतकरी भिकेला लावला.

म्हणजे सरकार स्थिर असो वा अस्थिर, शेतकऱ्यांचे सरळ सरळ खिसे कापायचे आणि शेतकरी त्यासाठीच आहेत असे प्रत्येक राजकीय पक्षाचे धोरणच होते.

८४ साली मात्र शेतकरी संघटनेने शेतीमालाचा प्रश्न पुढे केला आणि सर्वच राजकीय पक्षांना शेतकऱ्यांचे भले करण्याचा पुळका आला. निदान सर्वच राजकीय पक्ष सत्तेवर येईपर्यंत तरी तसे दाखवितात. सत्ता मिळाल्यानंतर प्रत्येकाच्या नियतीत फरक आला. नियतच फिरली एवढे मात्र नक्की. शेतकरीविरोधी निर्णय घेताना कुठल्याही सरकारला फारशी अडचण वाटली नाही; कारण गव्हाच्या आयातीच्या प्रश्नावर पंजाब हरियाणातले खासदार गप्प बसतात तर कापूस गासंड्यांची आयात होत असताना आणि यामुळे शेतकरी लुटला जातो आहे हे दिसूनसुद्धा कापूस-उत्पादकांचे प्रतिनिधी मूग गिळून बसतात. ते शेतकऱ्यांचे नाव घेत घेत सत्तेवर आल्यावर शेतकऱ्यांच्या लुटीच्याच योजना तयार करत आले.

येणाऱ्या निवडणुकीत प्रत्येक पक्ष भस्मासुरासारख्या स्थिरतेचे वरदान मागतो आहे. स्थिरतेचा मुद्दा सर्व प्रश्नांना बगल देतो आहे या सर्व गदारोळात शेतीमालाचा, शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न फार दूरवर फेकला जाण्याची भीती आज तरी वाटते आहे. ●

# स्वातंत्र्योत्सुक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी युरोप दौऱ्यावर

सध्या सुरू झालेल्या संगणकयुगात तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेग झपाट्याने वाढत आहे. एकेकाळी अशक्य वाटणारी गोष्ट आज सहजशक्य होऊ लागली आहे. पिढ्यान् पिढ्या आपली बुद्धी केवळ शेतकरी आणि उद्योजकांच्या लुटीकरिताच वापरलेली हिंदुस्थानातील प्रस्थापित बुद्धिजीवी मंडळी तंत्रज्ञानाच्या या झपाट्याने हडबडून गेली आहेत. या तंत्रज्ञानाचा लाभ शेतकऱ्यांना आणि उद्योजकांना झाला तर ते दारिद्र्यातून बाहेर पडतील आणि या ऐतखाऊ मंडळींच्या कह्यात रहाणार नाहीत; परिणामी या ऐतखाऊ बांडगुळांच्या गमजा संपतील. म्हणून या मंडळींनी वेगवेगळ्या युक्त्याप्रयुक्त्यांनी तंत्रज्ञानाच्या हिंदुस्थान प्रवेशाला विरोध सुरू केला आहे. त्यात ते त्यांच्याच पूर्वीच्या भूमिकांशी विसंगत भूमिकाही घेत आहेत.

उदाहरणार्थ, कापसाच्या प्रयोगाच्या पातळीवरील बोलगार्ड या कापसाच्या बियाण्याचे गुणधर्म असे आहेत की त्याचे रोपच बोलवर्म नावाच्या कापूस उत्पादकांच्या शत्रूअळीचा नायनाट करते. परिणामी, त्यासाठी फवाराव्या लागणाऱ्या महागड्या कीटकनाशकांचा प्रचंड खर्च वाचेल. शेतीमालाला रास्त भाव मागणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीमालाचा उत्पादनखर्च कमी करण्याचा सल्ला देणारी मंडळी – प्रसार सुरू व्हायचाच आहे – बोलगार्ड या बियाण्याच्या प्रयोगालाही विरोध करीत आहेत. या विसंगतीबद्दल त्यांना काही वाटत नाही. त्यापलिकडे जाऊन या मंडळींनी, आधुनिक तंत्रज्ञानामुळे ऐतखाऊपणाची जहागिरी जाण्याची वेळ आलेल्या औषध कंपन्यांच्या कृपेने आणि स्वयंघोषित शेतकरी नेत्यांना हाताशी धरून युरोप दौरा करून 'भारतातील शेतकऱ्यांवरील आधुनिक तंत्रज्ञानाचे आक्रमण थांबवा हो' असा टाहो फोडण्याचा घातला आहे. त्यांच्या या कारवायांनी भारतीय शेतकरी जगात बदनाम होईल. शेतकरी संघटना आणि किसान समन्वय समितीने या बाबीची गंभीर दखल घेऊन ५/६ मे १९९९ रोजी दिल्लीमध्ये एक मेळावा भरवला आणि युरोपियन राजदूतावासाला शेतकऱ्यांच्या या तोतया प्रतिनिधींबाबत सावध केले व स्वातंत्र्यासाठी, सरकारशाहीतून मुक्त होण्यासाठी, नेता-तस्कर-गुंडा-अफसर या चौकडीच्या दडपणाखालून सुटण्यासाठी गेली वीस वर्षे धडपडणाऱ्या शेतकऱ्यांचे रास्त म्हणणे जगासमोर मांडण्याच्या उद्देशाने आपले एक प्रतिनिधी मंडळ युरोप दौऱ्यावर जात असल्याचे सांगितले.

त्याप्रमाणे, १० मे, १९९९ रोजी शेतकरी संघटना व किसान समन्वय समितीचे एक प्रतिनिधीमंडळ युरोपला रवाना झाले असून ते देशोदेशीच्या विद्यापीठांमध्ये जाऊन भारतातील शेतकऱ्यांची 'स्वातंत्र्याची आस' जगापुढे मांडीत आहेत. या प्रतिनिधी मंडळात

सरदार भूपेंद्रसिंग मान, सरदार बलबीरसिंग राजेवाल, श्री. एस. पी. शंकर रेड्डी, श्री. शंकर धोंडगे, डॉ. मानवेंद्र काचोळे, श्री. गोविंद जोशी, श्री. बद्रीनाथ देवकर, श्री. हेमंत देशमुख आणि श्री. संजय पानसे यांचा समावेश या दौऱ्यात समाजवादी नियोजन व्यवस्थेच्या मार्गाने इंडियन सरकारने या देशातील शेतकऱ्यांना कसे लुटले आणि शेतकऱ्यांनाच नव्हे तर संपूर्ण देशाला कसे बरबादीच्या खाईत लोटले याची माहितीही हे प्रतिनिधी जगासमोर मांडतील.

●

## जागतिक शेतकरी संघटना

खुली अर्थव्यवस्था व जागतिकीकरण या दोनही गोष्टी जगभरच्या शेतकऱ्यांच्या हिताच्या आहेत, शेतीला पुन्हा आपले 'उत्तम' स्थान मिळवून देणाऱ्या आहेत यावर दृढ विश्वास असणारी एक जागतिक शेतकरी संघटना (World Agriculture Organisation) आकाराला येत आहे.

अमेरिकेतील सेंट लुई येथे खुली अर्थव्यवस्था व जागतिकीकरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या व ध्यास घेतलेल्या जगभरातील शेतकरी संघटनांचे एक अधिवेशन २३ ते २५ मे १९९९ या कालावधीत होणार असून त्यामध्ये शेतकरी संघटनेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी श्री. शरद जोशी स्वतः भाग घेणार आहेत. शेतकऱ्यांच्या दृष्टीने काही आशादायक घडत असताना तब्येतीची काळजी घेत बसणे आपल्याने जमणार नाही असे म्हणून त्यांनी या अधिवेशनाला जाण्याचे ठरविले आहे. त्यांच्या देखभालीसाठी त्यांच्या ज्येष्ठ कन्या सौ. श्रेया शहाणे त्यांच्यासोबत रहाणार आहेत.

अधिवेशनानंतर, २६ व २७ मे रोजी शेतीक्षेत्रातील खुलीकरण, जागतिकीकरण आणि सरकारी हस्तक्षेपाचे निर्मूलन याबाबतीत समविचारी संघटना/संस्थांना ते भेटी देणार आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यात ते आपला अमेरिका दौरा आटोपून भारतात परततील.

**स्वातंत्र्य हेच उद्दिष्ट.**

## संपर्कासाठी पत्ते

शेतकरी संघटनेच्या व शेतकरी महिला आघाडीच्या ज्या ज्या जिल्हा व तालुका प्रमुखांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत त्या सर्वांनी आणि कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी आपापली माहिती पुढील स्वरूपात –

शेतकरी संघटना,<br>
मध्यवर्ती कार्यालय,<br>
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण,<br>
ता. खेड, जि. पुणे ४१० ५०१.

या पत्त्यावर पाठवावी.

संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोडसह), फोन संपर्कासाठी फोन क्रमांक, (असल्यास फॅक्स फोनक्रमांक, ई-मेल), वय, शिक्षण, व्यवसाय, पद, पदावरील नियुक्तीचा दिनांक.

मोठ्या ऑपरेशनमुळे मा. साहेबांना आता पूर्वीसारखे वारेमाप दौरे करता येणार नाहीत, बैठकांतही संपूर्ण काळ भाग घेणे जमणार नाही. त्यामुळे, त्यांचे मार्गदर्शन पत्राद्वारे किंवा कॅसेटद्वारे कार्यकर्त्यांकडे व कार्यकर्त्यांमार्फत गावागावातील शेतकरी भावाबहिणींपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था उभी करण्याची गरज आहे. त्याची सुरवात म्हणून जिल्हा व तालुका प्रमुखांच्या संपर्कपत्त्यांचे हे संकलन करण्यात येत आहे. आपली माहिती हा निरोप मिळताच दोनतीन दिवसांच्या आत पोष्टात पडावी अशी अपेक्षा आहे.

अडचणीतून मार्ग शोधण्याची खटपट करीत आहोत, आपला सहभाग हवाच.

आपले,

**सौ. संध्या इंगोले**<br>
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

**वामनराव चटप**<br>
अध्यक्ष, शेतकरी संघटना.

★ स्वतंत्र भारत पक्षाच्या जिल्हा व तालुका प्रमुखांनीही आपली माहिती वरील सूचनेप्रमाणेच आंबेठाण कार्यालयाकडे पाठवावी.

**शंकर धोंडगे**<br>
महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष<br>
स्वतंत्र भारत पक्ष

वरील प्रत्येक पत्त्याबरोबर शेतकरी संघटकचे किमान ५ वर्गणीदार यावेत अशी अपेक्षा आहे. वार्षिक वर्गणी रुपये ५० असली तरी या पत्रासोबत ५ वर्गणीदारांचे फक्त रु. २००/- पाठवावेत.

## शरद जोशींची तब्येत

श्री. शरद जोशी यांच्या तब्येतीत वेगाने सुधारणा होते आहे. नियमित औषधोपचार, पथ्याचा आहार, नियतकालिक वैद्यकीय तपासणी आणि आवश्यक तितकी विश्रांती व त्यासाठी सदिच्छाभेटींवर घातलेले कडक निर्बंध यांना या सुधारणेचे श्रेय आहे. अजून दीड दोन महिने या गोष्टी पाळल्या गेल्या की ते पुन्हा नव्या जोमाने आणि आजारपणाच्या धास्तीशिवाय कामाला लागू शकतील असा डॉक्टरांनी विश्वास व्यक्त केला आहे.

मागील अंकातील 'तब्येतीचे वृत्त' वाचून पुण्यातील ज्येष्ठ साहित्यिक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनी श्री. शरद जोशींना लिहिलेल्या शुभेच्छा पत्रात म्हटले आहे की, आजाराशी पहिली लढाई तुम्ही जिंकली आहे, आता आवश्यक तो काळ विश्रांतीत घालवून सशक्त व्हा. अजून दोन महिन्यांनी तुम्ही नव्या जोमाने अधिक प्रभावी विचार घेऊन कामात उतराल याची खात्री आहे.

शेतकरी संघटनेच्या पाईकांनी अजूनही पत्राद्वारेच भेटण्याचा निग्रह ठेवावा. पत्र पाठविण्याचा पत्ता आंबेठाणचाच.

**– सुरेशचंद्र म्हात्रे**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st May, 1999

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
May 21, 1999

PNM - 133
Licence to post without prepayment
No. LWP-31

# कोण आम्हा अडवील ?

आजपर्यंत राजकारणी, कारखानदार, अधिकारी, विक्रेते आणि व्यापारी यांच्याच हाती दिसणारा सेल्युलर फोन आता पंजाबी शेतकऱ्यांच्या हाती पडला आहे आणि त्याच्या कृषिजीवनात मोठीच क्रांती झाली आहे. पंजाबमधील स्पाईस टेलकॉम या सेल्युलर फोन संचालक संस्थेने 'ॲग्रीट्रेक' नावाची सेवा सुरू केली असून मिनिटाला फक्त दोन रुपये सेवाशुल्कात, आपल्या सेल्युलर फोनवर विशिष्ट क्रमांक दाबले (डायल केले) की शेती आणि शेती उत्पादनांच्या व्यापारासंबंधी वेगवेगळी माहिती मिळते. उदाहरणार्थ, ५५९ क्रमांक दाबला की विविध मुख्य उत्पादनांच्या त्या दिवशीच्या चढत्याउतरत्या किंमतीची वेगवेगळ्या बाजारपेठांतील माहिती मिळते – तीसुद्धा सौजन्यपूर्ण आवाजात. त्यापलिकडे, भात, गहू, भाजीपाला, फळे किंवा अगदी फुले अशा एखाद्या विशिष्ट उत्पादनाच्याच किंमती हव्या असतील तर त्यापुढे १ ते ९ पैकी त्या उत्पादनासाठी असलेला क्रमांक दाबला की झाले. ५६० नंबर फिरवला तर शेतकऱ्याने आपला माल बाजारात न्यावा किंवा नाही, नेल्यास कोणत्या मंडीत न्यावा याबद्दल सल्ला मिळतो; खरेदीदारांची आणि विक्रेत्यांची यादी आणि त्याबरोबरच सोयीस्कर खरेदीदारा/विक्रेत्याची शिफारसही मिळते. एकूण दहा ते बारा मंड्यांसंबंधी माहिती एकत्रित केली जाते व दिवसातून दोन वेळा सुधारित केली जाते.

या सेवेची अधिकृत सुरुवात गेल्या बैसाखीला म्हणजे १३ एप्रिल ९९ रोजी झाली आणि शेतकऱ्यांना या सेवेचा चांगलाच उपयोग होऊ लागला आहे.

कपूरथळा जिल्ह्यातील मन्सुरवाल येथील सुरिंदर कुमारच्या लेखी ही सेवा म्हणजे देवाची देणगीच ठरली. बैसाखीच्या सुमारास मंडीमध्ये बटाट्याचे भाव ८० किलोच्या पिशवीला ९० ते १२० रुपये होते; पडतही होते. तेथील सरकारी शीतगृहामध्ये जागा शिल्लक नसल्याने सुरींदर कुमार थांबू शकत नव्हता, पण इतक्या कमी दराने विकूही इच्छित नव्हता. 'ॲग्रोट्रेक'बद्दल त्याला कुणीतरी सुचविले. त्याने 'ॲग्रोट्रेक'कडे येत्या दोन तीन आठवड्यात बटाट्याला काय भाव मिळू शकतील याची विचारणा केली आणि त्याला सल्ला मिळाला की त्याने आपला माल दिल्लीजवळील कुंडली येथील शीतगृहात हलवावा. त्याने त्याप्रमाणे केले आणि आठवड्यापूर्वी त्याला पिशवीमागे २२० ते २४० रुपयांचा भाव मिळाला.

माल एकदा मंडीत गेला की तो न विकता बाहेर पडता येत नाही असा पंजाबमधील बाजार समितीचा कायदा आहे. त्यामुळे आडत्यांच्या हाती सापडणाऱ्या शेतकऱ्यांना आता त्या जाळ्याबद्दल सावध करणारी ही सेवा म्हणजे वरदानच ठरणार आहे. सध्यातरी या सेवेचा फायदा टिकाऊ उत्पादनांच्या शेतकऱ्यांना होईल, नाशवंत मालाचे उत्पादक अजूनही आडत्यांच्याच कचाट्यात राहतील; पण, 'तंत्रज्ञान' त्यातूनही शेतकऱ्यांना सोडवील.

तंत्रज्ञानाचा महाप्रवाह वहात आहे, त्यावर आरूढ होणारे नुसते वाचणारच नाहीत, प्रगती साधणार आहेत; या महाप्रवाहाला अडवू पहाणारे आज ना उद्या वाहून जातील.

# स्वतंत्र भारत पक्षाला निवडणूक आयोगाची मान्यता

चार पाच वर्षांच्या अथक प्रयत्नांअंती व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वाधिक महत्त्व देणाऱ्या 'स्वतंत्र भारत पक्षा'ला निवडणूक आयोगाने दि. ५ मे १९९९ रोजी 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून मान्यता दिली.

स्वतंत्र भारत पक्षाने मान्यतेसाठी केलेल्या अर्जाची सुनावणी दिल्ली येथे निवडणूक आयोगासमोर दि. ५ मे १९९९ रोजी झाली. या सुनावणीमध्ये सर्वश्री पाशा पटेल (महासचिव) राम नेवले व किशोर माथनकर (कोषाध्यक्ष) यांनी स्वतंत्र भारत पक्षाचे प्रतिनिधित्व केले. अर्जासोबत दिलेली माहिती, सुनावणीच्या वेळी केलेले शंकानिरसन समाधानकारक व सर्व कायदेशीर बाबी पुऱ्या करणारे ठरल्यावर निवडणूक आयोगाने स्वतंत्र भारत पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता देण्यात येत असल्याचे सांगितले.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मानवेंद्र काचोळे असून महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष श्री. शंकर धोंडगे आहे.

निवडणूक आयोगाकडून मान्यतेचे पत्र हाती येताच पक्षाला अधिकृत चिन्ह मिळविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल असे महासचिव श्री. पाशा पटेल यांनी सांगितले.

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४
एस्.टी.डी. - ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.